# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ८

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक ०६/०३/२०२४ सकाळी १२-३० वाजता भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ६. | श्री. समिर शेख | सहा. आयुक्त |
| ७. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ८. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ११. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १२. | श्री. एन. के. बागुल | शाखा अभियंता |
| १३. | श्री. पी.डी. चव्हाण | सहा. अभियंता |
| १४. | श्री.सी. एम. उगले | सहा.अभियंता,पा.पु.वि. |
| १५. | श्री. हेमंत पावटे | कनिष्ठ अभियंता,बांधकाम विभाग |
| १६. | श्री. प्रकाश सोनवणे | नगररचना विभाग |
| १७. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १८. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १९. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| २०. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |
| २१. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक,आस्थापना विभाग |
| २२. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २३. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २४. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |

| | | |
|---|---|---|
| २५. | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल,शिक्षण मंडळ |
| २६. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २७. | श्री.अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २८. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

## सदर बैठकीत पारीत झालेले ठराव व प्रस्ताव

---

**प्रशासक ठराव क्र.५९** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. नगरसचिव विभागाकडील मागील प्रशासकीय स्थायी समिती सभांचे इतिवृत्त

विषय क्रमांक:-५८ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्र.६ व ७ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

---

वाचा क्र.०१ व नगरसचिव विभागाकडील इतिवृत्तानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ६ दिनांक २२/०२/२०२४ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९ ते ५३ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ७ दिनांक २७/०२/२०२४ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४ ते ५८ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६०** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/बां.वि.४८७ दिनांक २७/०२/२०२४

विषय क्रमांक:-५९ अल्पसंख्यांक क्षेत्र विकास सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र.०३ मध्ये विटाभट्टी परिसरात अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शहर अभियंता यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अल्पसंख्यांक क्षेत्र विकास सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र.०३ मध्ये विटाभट्टी परिसरात अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे या कामास मा. जिल्हाधिकारी सो. यांचे जा.क्र.१२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१४८४ दि.२६/१२/२०२३ अन्वये **५९,९९,३८८/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्रक्र./३९४/२०२३ दि.०१/१२/२३ अन्वये रक्कम रु.**५९,९९,३८८/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **जितेंद्र संजय पाटील** यांचे दर **अंदाजपत्रक** दराने आहे. सबब कंत्राटदार **जितेंद्र संजय पाटील** यांचे **अंदाजपत्रक** दरास व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६१** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/बां.वि.४८९ दिनांक २७/०२/२०२४

विषय क्रमांक:-६० अल्पसंख्यांक क्षेत्र विकास सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र.७ मध्ये मोगलाई सर्व्हे नं.१३४ कब्रस्तान येथे संरक्षण भिंत बांधणे कामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शहर अभियंता यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अल्पसंख्यांक क्षेत्र विकास सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र.०७ मध्ये मोगलाई सर्व्हे नं.१३४ कब्रस्तान येथे संरक्षण भिंत बांधणे या कामास मा.जिल्हाधिकारी सो. यांचे जा.क्र.१२/क/कक्ष-५/नपाप्र/ बांध/१४९२दि.२६/१२/२३ अन्वये **३९,९३,२३८/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३९४/२०२३ दि.०१/१२/२३ अन्वये रक्कम रु. **३९,९३,२३८/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **यासिन अब्दुल जब्बार शेख** यांचे दर **अंदाजपत्रक** दराने आहे. सबब कंत्राटदार **यासिन अब्दुल जब्बार शेख** यांचे **अंदाजपत्रक** दरास व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६२** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/वि.वि.३२५ दिनांक २७/०२/२०२४

विषय क्रमांक:-६१ मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२२-२३ अंतर्गत साक्री रोडवरील विविध ठिकाणी व परिसरातील चौकात हायमास्ट व पथदिवे बसविणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शाखा अभियंता (विद्युत विभाग) यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. दि. / /२० मा. आयुक्त/ उपायुक्त धुळे महानगरपालिका यांचे टिप्पणी/ **मा. जिल्हाधिकारी सो**. यांची प्रशासकीय मान्यता/१२१ दि. ०७/०२/२०२३ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु. १,९९,९६,११४/-** मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./वि.वि./३४८ दि.०७/०२/२०२४** अन्वये व **दि. ०८/०२/२०२४** च्या **दै. इंडिअन Express व दै. पुण्यनगरी, धुळे** व धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा /~~कोटेशन~~ प्रसिद्ध करणेत येवून **दि.०८/०२/२०२४** रोजी निविदा मागविणेत आले आहेत.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractor, नाशिक** यांचे दर तुलनेत सर्वात कमी आहे. सबब कंत्राटदार **मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractor, नाशिक** यांनी सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६३** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/वि.वि.३८३ दिनांक २७/०२/२०२४

विषय क्रमांक:-६२ देवपुर नदी किनारी येथील चौपाटी जागेतील नवीन संत रविदास उद्यानात सुरक्षा पुरविणेकामी सिक्युरीटी गार्ड व्यवस्था करणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शाखा अभियंता (विद्युत विभाग) यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पांझरा नदि किनारी नुतन उद्यान लोकार्पण साहेळल्यानंतर उद्यान खूल करण्यात आले होते. सदरची सुरक्षा व्यवस्था लोकार्पण कार्यक्रमा नंतर उदयान नागरिकांसाठी खुले करण्यात आलेले आहेत. यासाठी उद्यान सुरक्षिततेसाठी या पुर्वी मंजुर दराप्रमाणे में, कॅपिटल सिक्युरीटी फोर्स ही संस्था काम करण्यास तयार असल्याने प्रती कर्मचारी १८५००/- मात्र १८% जी.एम.टी करासह च्या दरांने १२ तास ड्युटी मध्ये चार कर्मचारी या प्रमाणे प्रती दिवस ८ कर्मचारी एक महिन्या करीता ठेवणे आवश्यक आहे. तरी या प्रमाणे प्रती महिना रक्कम **रु.२,००,५१३/-** मात्र खर्च एक महिन्यासाठी प्रस्तावित आहे.

पांझरा नदि किनारी संत रविदास उद्यानात सुरक्षा रक्षक पुरविणेकामी , कॅपिटल सिक्युरीटी फोर्स हया संस्थेस सिक्युरीटी गार्ड व्यवस्था करणेस वार्षिक भाडेतत्वावर करार पद्धतीने चालविण्याकामी निविदा कार्यादेश होईपावेतो यापुर्वी झालेल्या मंजूर दराप्रमाणे काम करणेस मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६४** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/वि.वि. ३८८ दिनांक २७/०२/२०२४

विषय क्रमांक:-६३ धुळे मनपा क्षेत्रातील दैनदिन निगा दुरूस्ती करणे,जुने पथदिवे बदलविणे व अनुषंगिक कामे करणेकामी वार्षिक करार पध्दतीने निविदा प्रक्रिया करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शाखा अभियंता (विद्युत विभाग) यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा हद्दीतील शहर व देवपूर भागात जुने पथदिवे काढून नवीन LED पथदिवे बसविणे व पाच वर्ष देखभाल दुरुस्ती करणेकामी संदर्भ क्र.१ नुसार मे.श्री.वल्लभ इलेक्ट्रिकल,गुजरात यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.त्यानुसार प्रभाग निहाय LED पथदिवे बसविणेचे काम सुरु करणेत आले होते.आजपावतो विविध क्षमतेचे एकूण 17677/- LED पथदिवे बसविणेत आलेत.

वरीलप्रमाणे माहे नोव्हेंबर 2023 पर्यंत प्रभाग निहाय १७,६७७ मात्र LED पथदिवे बसविले आहेत.परंतु डिसेंबर 2023 पासून मक्तेदाराने नवीन LED बसविणेचे काम पूर्णतः बंद केले आहे.याबाबत मक्तेदाराला वेळोवेळी साहित्य पुरवठा करणेबाबत लेखी/तोंडी सूचना केल्या आहेत.याबाबत जुन्या बंद पथदिव्यांची दुरुस्ती होत नसल्याने प्रभागातील नागरिक/नगरसेवक/नगरसेविका यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उर्वरित प्रभाग निहाय जुन्या पथदिवे एकूण ३६२८ आहेत.

त्यानुसार उक्तप्रमाणे प्रभाग निहाय उर्वरित जुने पथदिवे ३६२८ बदलणेचे काम शिल्लक आहे.व याच जुने पथदिवे बंद असल्याबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहे.

मक्तेदार श्री.वल्लभ इलेक्ट्रीकल्स यांना तातडीने काम करण्या करीता नोटीस देण्यात आली नोटीस क्र.३३९ दि.१०/०१/२०२३ व्दारे मक्तेदाराला अंतिम नोटीस देण्यात आली असून,यामध्ये करारनामा शर्त क्र.४४ अन्वये आपली सुरक्षा रक्कम जप्त करून अन्य मक्तेदाराकडून काम करून घेण्यात येईल असे कळविले होते.

सदयास्थितीत मक्तेदाराकडुन कार्यादेशानुसार दैनंदिन कामे करण्यात येत आहे.तथापी वारवार थकित बीलाची सबब पुढे करून मक्तेदाराकडुन अंत्यत संथ गतीने काम सुरू असुन तक्रारीची संख्येत वाढ झालेली आहे.मक्तेदराचे देयके लेखा शाखेकडे सादर झाले असुन त्या पैकी ४ कोटी रक्कमेची देयक अदायगी प्रलंबीत आहे.

मक्तेदारास पथदिवे निगा दुरूस्तीसाठी फक्त मंजुरी दर ४.८३ प्रती महिना देण्यात येत आहे. तसेच पथदिवे चालु बंद करण्याचे कामी प्रती मेन स्विच ४२३.१५ दर असुन सदरचे दर अत्यंल्प आहे.सदरचे दर हे आवश्यक मनुष्यबळा नुसार बाजार भाव दरानुसार अयोग्य असुन चुकीचे आहे.तथापी मक्तेदाराकडुन या दराप्रमाणे निविदा दर आल्याने त्या दराने त्यास काम करणे अनिवार्य ठरले.

वरील १ ते ३ प्रमाणे निविदा कारवाई करण्यास मजुरीसह मक्तेदारास साहित्या करीता ही खर्च दयावा लागणार आहे. आयटम रेटनुसार निविदा दर प्रस्तावित केलेले आहे.

विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार १ ते ३ भागासाठी आयटम दराप्रमाणे वार्षिक करारपध्दतीने मक्तेदार निश्चिती करण्यासाठी २ वर्ष कालावधी मुदती करीता निविदा मागविणेस व संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६५** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/आस्था/२२२७ दिनांक २७/०२/२०२४

विषय क्रमांक:-६४ मानधनावरील कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक) यांना ६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यालयीन अधिक्षक यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मानधन तत्वावरील २ कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक) यांना रु. २०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता नियुक्ती देण्यात आली होती. त्यांची नियुक्त दि.२१/२/२०२४ रोजी संपुष्ठात येत आहे. तसेच मानधन तत्वावरील ३ डाटा ऐंट्री ऑपरेटर यांना रू.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता नियुक्ती देण्यात आली होती त्यांची नियुक्त दिनांक २९/०२/२०२४ रोजी संपुष्ठात आलेली आहे.

मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार उक्त मानधनावरील २ कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक) तसेच ३ डाटा ऐंट्री ऑपरेटर यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मूदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६६** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/आस्था./२२२६ दिनांक २७/०२/२०२४

विषय क्रमांक:-६५ धुळे मॅरेथॉन - २०२४ सिझन – २ साठी धुळे मनपामार्फत सानुग्रह अनुदान रू. १० लक्ष मात्रला कार्यात्तर मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यालयीन अधिक्षक यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे जिल्हा पोलीस दलाच्या वतीने कम्युनिटी पॉलिसिंग कार्यक्रमांतर्गत तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, म.न.पा. व जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने दि. ०४/०२/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा पोलीस मुख्यालय, धुळे येथे धुळे मॅरेथॉन -२०२४ सिझन - २ चे आयोजन करण्यात आले होते.

सदर मॅरेथेन मध्ये २०००० पेक्षा अधिक स्पर्धकानी सहभाग घेतला असून, धुळे महानगरपालिकेकडून रक्कम रु.१०,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान मिळणेबाबत म. प्रभारी पोलीस अधीक्षक, धुळे यांनी विनंती केलेली होती.

त्यानुसार धुळे महानगरपालिकेमार्फत सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकानुसार महापौर केसरी व मॅरेथॉन या लेखाशिर्षा अतर्गत रक्कम रु.१०,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म. पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांना देण्यात आलेले आहे.

उक्त प्रस्तावानुसार धुळे मॅरेथॉन - २०२४ सिझन – २ साठी धुळे मनपामार्फत सानुग्रह अनुदान रू. १० लक्ष मात्रला कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६७** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/बां.वि.४९४ दिनांक ०१/०३/२०२४

विषय क्रमांक:-६६ महिला बाल कल्याण सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्व्हे नं.४८९/२/१ येथील जागेत महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शहर अभियंता यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महिला बाल कल्याण सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्व्हे नं.४८९/२/१ येथील जागेत महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा बांधणे च्या कामास धुळे महानगरपालिका समिती ठराव नं.३ दि.२०/०७/२०२३ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०८/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४०,४८,६९३/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६९४/२०२३ दि.२०/१२/२०२३ अन्वये रक्कम रु.**४०,४८,६९३/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार श्री./मे.**अंकित किशोर भंडारी** यांचे दर **अंदाजपत्रक** दराने आहे. सबब कंत्राटदार श्री./मे. **अंकित किशोर भंडारी** यांची **अंदाजपत्रक** दरास व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६८** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/बां.वि.४९२ दिनांक ०१/०३/२०२४

विषय क्रमांक:-६७ महिला बाल कल्याण सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्व्हे नं.४८७/२ येथील जागेत महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा उभारणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शहर अभियंता यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महिला बाल कल्याण सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्व्हे नं.४८७/२ येथील जागेत महिलांसाठी व बालकांसाठी व्यायाम शाळा उभारणे या कामास धुळे महानगरपालिका समिती ठराव नं.३

दि.२०/०७/२०२३ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०८/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**३२,५४,००९/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६९५/२०२३ दि.२०/१२/२०२३ अन्वये रक्कम रु. **३२,५४,००९/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार श्री./मे.**अंकित किशोर भंडारी** यांचे दर **अंदाजपत्रक** दराने आहे. सबब कंत्राटदार श्री./मे. **अंकित किशोर भंडारी** यांची **अंदाजपत्रक दरास** व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.६९** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/बाजार/२०० दिनांक ०४/०३/२०२४

विषय क्रमांक:-६८ दैनंदिन बाजार फी वसुली करिता निर्णय घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

संपुर्ण धुळे शहरासाठी दै. बाजार फी वसुली मक्ता एका वर्षासाठी रु. ३५,१०,१५०/- + १८ % GST वेगळा नुसार दै. आपला महाराष्ट्र व दै. दिव्य मराठी या वर्तमानपत्रातुन जाहिरात देऊन जाहिर लिलाव २३-०२-२०२४ रोजी ठेवण्यांत आला होता मात्र सदर लिलावात कुणीही भाग घेतला नाही म्हणुन पुनश्च फेर जाहिर लिलाव दि. ०१-३-२०२४ शुक्रवार रोजी दुपारी ४-०० वाजता जाहिर लिलाव ठेवण्यांत आला मात्र उक्त फेर जाहिर लिलावामध्येही कोणीही बोलीधारकांनी भाग घेतला नाही.

मक्ता न गेल्यामुळे दै. बाजार फी वसुलीसाठी मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करून मागील वर्षी निश्चित झालेली रक्कम रू.३३,४३,०००/- + १८% GST ह्या रकमेस पुनश्च मक्तेदार यांनी लेखी होकार दर्शविल्यांस त्यांना किंवा मनपामार्फत आवश्यक ती यंत्रणा कार्यरत करून त्यांच्या मार्फत दैनदिन बाजार फी वसूली करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.७०** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/स्था.सं.कर/६० दिनांक ०४/०३/२०२४

विषय क्रमांक:-६९ स्थानिक संस्था कर विवरण तपासणीकरीता सनदी लेखापाल नियुक्त करणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यालयीन अधिक्षक,स्थानिक संस्था कर विभाग यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

स्थानिक संस्था कर विभागातील निर्धारणा तपासणी कामकाज गतिमान होण्याकामी C.A (सनदी लेखापाल ) यांची नियुक्ती करणेकामी विहित अल्पमुदतीची निविदा प्रक्रिया करण्यात येवून ई-निविदा दि.१३/०२/२०२३ रोजीचे लोकसत्ता व लोकमत या वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द झाली असल्याने ई-निविदा सुचना क्र.२२२ सन २०२३-२४, निविदा संच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

सदर निविदेत १. आर.पी.डी ॲण्ड असोसिएटस (नाशिक) २. ए.एस.बेदमुथा ॲण्ड कंपनी (नाशिक) ३.के.बी.पी.एस. कंपनी (नाशिक) या ३ निविदाधारकाचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले १ ते ३ निविदाधारकांना पात्र करण्यात आले आहे व व्यापारी लिफाफा उघडण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०४/०२/२०२४ रोजी व्यापारी लिफाफा उघडण्यात आले त्यात १ ते ३ पात्र निविदाधाकांचे व्यापारी लिफाफ्यात सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र | तपशील/बाब | मनपाने सादर कलेले दर | प्रति नग | आर.पी.डी ॲण्ड असोसिएटस (नाशिक) | ए.एस.बेदमुथा ॲण्ड कंपनी (नाशिक) | के.बी.पी.एस. कंपनी (नाशिक) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे महानगरपालिका क्षेत्रातील नोंदणीकृत व्यापा-यांनी नमुना " ड " (२) मधील विवरणपत्रे सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ ची सादर केलेली विवरण पत्रांची प्राथमिक छाननी शुल्क. (LUMSUM स्वरुपात सादर करावी) | रु. १७५/- प्रति विवरणपत्र (सर्व करा सहित) | १ | १४४.०० **सर्वांत कमी दर (एल-१)** | १७५.०० | १६२.०० |
| २ | उपरोक्त विवरण पत्रांची छाननी झाल्यावर संबंधीत करदात्यावर एकुण कर दायित्व निश्चित करुन देण्याच्या संपुर्ण प्रक्रियेसाठी दायित्व निश्चितीच्या रक्कमेवर अपेक्षित मेहनताना शुल्क. ......... % सादर करावी. (प्रति विवरण पत्र फी.) | करदात्याकडुन निश्चित करुन दिलेल्या वसुलपात्र रक्कमेच्या ५% (सर्व करा सहित) | १ | ३.९० % **सर्वांत कमी दर (एल-१)** | ५.०० % | ४.५० % |

उक्त १ ते ३ निविदाधारकानी सादर केलेले दर यात आर.पी.डी ॲण्ड असोसिएटस (नाशिक) यांनी सर्वात कमी सादर केल्यास दिसुन येत आहे तरी आर.पी.डी ॲण्ड असोसिएटस (नाशिक) यांच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत संबंधित संस्थेशी आवश्यक तो अर्टी-शर्तीचा करारनामा करून तात्काळ कामास सुरूवात करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.७१** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/वि.वि./३९५ दिनांक ०४/०३/२०२४

विषय क्रमांक:-७० डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या पत्रानुसार जयंती कार्यक्रमा करीता विद्युत रोषनाई,फ्लड लाईट व्यवस्था व अनुषंगिक कामे मागील मंजूर दरानुसार करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शाखा अभियंता (विद्युत विभाग) यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जेल रोड वरील पुतळया जवळ विदयुत रोशनाई,लाईटींग,फोकस, स्टेज इ. व्यवस्था सालाबादा प्रमाणे करणे बाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समिती,धुळे यांचे दि.०४/०३/२०२४ रोजी निवेदन प्राप्त आहे.

दि.१४ एप्रिल२०२२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती आहे.दरवर्षी धुळे महानगरपालिके मार्फत स्टेज व्यवस्था, लाईटींग व्यवस्था व अनुषंगीक व्यवस्था जयंती निमित्त करणे येते.

वरील प्रमाणे विविध व्यवस्था कामासाठी मागिल वर्षी धुमपा/विवि/०१ दि.१३/०४/२०२३ नुसार मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स, धुळे यांना रू.३,१५,८००/- मात्रचे कार्यादेश देण्यात आले होते. मागील वर्षीचा खर्च रू. ३,१५,८००/- मात्र आहे.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार महापुरूषाची जयंती उत्सव्र या लेखाशिर्षका करीता तरतुद आहे. उक्त प्रमाणे सदरच्या तरतुदी नुसार व बाजार भावा प्रमाणे मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे

यांच्याकडून करणेस व त्यासाठी येणारा संभाव्य खर्चास व सदर जयंतीच्या अनुषंगाने असलेली आवश्यक कामे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.७२** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/वि.वि./११५ दिनांक ०४/०३/२०२४

विषय क्रमांक:-७१ बाभळे जलशुध्दीकरण केंद्र येथील क्लोरिन गॅस, डोसींग उपकरणे दुरूस्ती करणेकामी झालेल्या खर्च रक्कम रू. १,४५,७६०/- मात्रला कार्यात्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शाखा अभियंता (विद्युत विभाग) यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे म.न.पा. बाभळे जलशुध्दीकरण केंद्र येथील क्लोरींग गॅस मशिन हे जुने असल्यामुळे व त्यात वारंवार बिघाड होत असते व त्यामुळे क्लोरींग गॅस गळती होवून जिवीत हानी होवू शकते. तसेच वॉटर फिल्टरला अडचणी येत असतात. अशुध्द पाणी पुरवठा होवून शेवाळयुक्त पाणी येते त्यामुळे आरोग्यास धोका निर्माण होवून आजार (साथीचे) वाढू शकतो. त्यामुळे उक्त क्लोरींग मशिनची त्वरीत व ताडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सदर चे काम करून घेण्यात आलेले आहे.

उक्त प्रमाणे दुरुस्ती कामी ॲक्वा फ्लो इंजिनिअर्स, मुंबई यांचे कोटेशन मागविणेत आले असून त्यास खर्च रक्कम **१,४५,७६०/-** (अक्षरी रुपये एक लाख पंचेचाळीस हजार सातशे साठ मात्र) आहे.

सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणी पुरवठा केंद्र निगा दुरुस्ती कामासाठी **रु. २ कोटी** मात्र तरतूद आहे.तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम **रु. १,४५,७६०/-** चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा **मे. ॲक्वा फ्लो इंजिनिअर्स, मुंबई** यांच्या कडून करून घेण्यास व सदरचे कामास **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३)** प्रमाणे कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.७३** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/वि.वि./३९६ दिनांक ०४/०३/२०२४

विषय क्रमांक:-७२ माझी वंसूधरा ३.० नुसार डी.पी.आर.सादरीकरण तसेच शासन मान्यता घेणेकामी श्री.एंटरप्रायझेस,मुंबई यांना मनपा मंजूर दराप्रमाणे काम करणेकरीता मूदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व शाखा अभियंता (विद्युत विभाग) यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

माझी वसुंधरा २.० अभियाना अंतर्गत शासन निर्णयानुसार विविध कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकीय मान्यता घेणे, प्रकल्प अंमलबजावणी करणे कामी अनुभवी तांत्रिक प्रकल्प सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती करणे कामी श्री.इंन्टप्राईझेस, मुबंई यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.

वरील कार्यादेशानुसार संबधित मक्तेदारा यांनी माझी वसुंधरा २.० च्या कामी शासनाची प्रशासकिय मान्यता प्राप्त केली आहे व सदरच्या कामाची निविदा कार्यवाही झालेली आहे. उक्त कामाबाबत मंजूर दर २% शासन निर्णय संकीर्ण-२०१८/प्र.क्र ५४/नवि-१६ दि.४/०६/२०१८ प्रमाणे प्रत्येक टप्प्यावर निश्चित आहेत.

शासन निर्णयातील मंजूर दराप्रमाणे मक्तेदार श्री.एंन्टप्राईझेस यांनी माझी वसुंधरा ३.० चे प्रकल्प अहवाल तयार करणेस समंती दर्शविलेली आहे. मक्तेदारास पुर्वीच्या कार्यादेशा प्रमाणे माझी वसुंधरा अभियान ३.० च्या कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व शासन मान्यता घेणेकामी यापुर्वीच्या मंजूर दराप्रमाणे श्री.एंन्टप्राईझेस यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.७४** **दिनांक:-०६/०३/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/आरोग्य/८२८ दिनांक ०४/०३/२०२४

विषय क्रमांक:-७३ मनपा हद्दीतील मोकाट जनावरे पकडणेकामी पुर्वी नियुक्त संस्था यांना मूदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत धुळे शहरात मोकाट जनावरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढत असून मोकाट जनावरे मालक शहरातील पेठ भागात रस्त्यावर जनावर सोडत असल्याने सदर जनावर हे रस्त्यावर ठाण मांडून बसत असल्यामुळे त्यांना पकडुन कोंडवाड्यात अथवा मनपा सांगेल त्या ठिकाणी जमा करणेकामी ३ महिने कालावधी करीता कोटेशन पध्दतीने श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांना ४ मजुर मनपाच्या वाहनावर पुरविण्याकामी प्रती कामगार प्रती दिवस रु.७४०/-या दराप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानुसार त्यांनी दिनांक २२/११/२३ रोजी कामाची सुरुवात केलेली होती. याबाबत मा.आयुक्त सो. यांनी सदर फिरणारे मोकाट व भटके जनावरांचा बंदोबस्त तात्काळ करण्यात यावा याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार उक्त कोटेशनधारक श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांची कामाची मुदत माहे फेब्रुवारी-२०२४ मध्ये संपुष्टात आलेली आहे. उक्त काम करणे हे आवश्यक असल्याने तसेच येणाऱ्या दिवसात पवित्र रमजान महिना व इतर सणासुदिचे दिवस येत आहेत. त्यामुळे शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे. तसेच येत्या काही दिवसात आचारसंहिता लागु होणार आहे त्यामुळे सद्या कोटेशन पध्दत अथवा निविदा प्रक्रिया करण्यास उशिर लागु शकतो.

त्याअनुषंगाने उक्त कोटेशनधारक श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांचे दर प्रती कामगार प्रती दिवस रु.७४०/- मंजुर असल्याने त्यांना पुढील ६ महिने करीता अथवा नविन निविदा प्रक्रिया होईपावेतो कामाची मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच याकामी ४ कर्मचारी नियुक्त होते.कामाची व्यापती व आवश्यकता लक्षात घेता विभागाच्या सुचनेनुसार मनपाच्या ट्रॅक्टरवर वाहनचालक १ व इतर १ कर्मचारी यांचा समावेश करण्यात यावा

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**